# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १३.०२.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. १२/०२/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७८ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ४६,७००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. १२/०२/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण २४ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन १४५ लिटर दारू असा एकुण ५७,४००/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपघाताचे दाखल गुन्हे:—**

दि. १२/०२/२०२३ रोजी पोस्टे कुरूंदा, कळमनुरी, हटटा येथे प्रत्येकी ०१ असे एकुण ०३ गुन्हे कलम ३०४(अ),२७९,३३७,३३८ भादवी अन्वये दाखल होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १२/०२/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण १७ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत दि. १२/०२/२०२३ रोजी पोस्टे कळमनुरी येथे ०१ इसमाविरूध्द कलम ४/२५ भाहका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले असुन पुढील तपास पोलीस करित आहेत.

**अपघात दाखल गुन्हे:—**

दि.१२/०२/२०२३ रोजी पोस्टे बाळापुर व बासंबा येथे प्रत्येकी ०१असे एकुण ०२ अपघाताचे गुन्हे कलम २७९,३३७,३३८ भादवी सहकलम १३४/१८७ मोवाका प्रमाणे दाखल होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.